# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषी नगर, अकोला ४४४ १०४

**वाचा:** १) जाहिरात क्र. पंदेकृवि/आस्था/ जाहिरात/२०१९, दि. ९ सप्टेंबर, २०१९.
२) विद्यापीठ सुचना क्र. पंदेकृवि /जाहिरात/भप्र/कृस/२०१९, दि. २० नोव्हेंबर २०१९.

## कृषी सहायक पदभरती करीता लेखी परिक्षेबाबत सुचना

**क्र.पंदेकृवी/ जाहिरात/लेप/२०२१** **दिनांक २३ सप्टेंबर २०२१**

डॉ. पं.दे.कृ.वी. अकोला अंतर्गत कृषी सहायक (पदवीका), कृषी सहायक (पदवीधर) संवर्गांसाठी घेण्यात येणा-या लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम आणि ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जातील माहितीचे आधारे उमेदवारांच्या तात्पुरत्या स्वरूपाच्या यादया विद्यापीठाचे संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर यापुर्वीच प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेल्या सर्व उमेदवारांची लेखी परिक्षा खालील प्रमाणे नियोजीत करण्यात आली असून, उमेदवारांना लेखी परिक्षा प्रवेशपत्रासाठीची लिंक विद्यापीठ संकेतस्थळावर वर लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उमेदवारांना प्रवेशपत्राशिवाय (Hall Ticket) परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. परिक्षा केंद्रासंबंधी माहिती उमेदवारांचे प्रवेशपत्रावर तसेच विद्यापीठाचे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

| अ.क्र. | पदाचे नांव | लेखी परिक्षा दिनांक | वेळ | |
|---|---|---|---|---|
| १ | कृषी सहायक (पदवीका) | दिनांक २४.१०.२०२१ | सकाळी | १०.०० ते १२.०० |
| २ | कृषी सहायक (पदवीधर) | दिनांक २४.१०.२०२१ | दुपारी | ०३.०० ते ०५.०० |

उमेदवारांना संकेतस्थळावरून प्रवेशपत्र प्राप्त करण्यास काही अडचण आल्यास त्यांनी ०७२४-२२५८२२६ वर संपर्क साधावा अथवा स्वत:चे नांव, जन्म तारीख व पत्ता असलेले फोटो ओळखपत्र सोबत आणून संबंधित पदांच्या लेखी परिक्षेच्या दोन दिवस अगोदर, संगणक केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला येथून प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे.

शासन निर्णय क्र. बीसीसी २०२०/प्र.क्र. ३२०/१६ ब, दिनांक ५ जुलै २०२१ नुसार साशैमाप्र प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांनी त्यांची उमेदवारी खुला (अराखीव) अथवा आर्थिकदृष्टया दुर्बल घटक यापैकी कुठल्या प्रवर्गात ग्राहय धरण्यात यावी याबाबतचा विकल्प ऑनलाईन लॉगीन करून दयावा सदर विकल्प दिल्याशिवाय प्रवेशपत्र (Hall Ticket) प्राप्त होणार नाही. तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रवर्गाचा विकल्प देणा-या उमेदवारास सक्षम प्राधिकरणाव्दारे निर्गमीत सदर प्रवर्गाचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर करणे अनिवार्य राहील.

तसेच लिहीण्यास सक्षम नसलेल्या दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी लेखनिकाची (Writter) आवश्यकता असल्यास त्यांनी त्याबाबतचा विकल्प ऑनलाईन लॉगीन करून दयावा.

लेखी परिक्षेसाठीची पात्रता उमेदवारांनी ऑनलाईन भरलेल्या माहितीच्या आधारे ठरविण्यात आली आहे. त्यामुळे लेखी परिक्षेनंतर गुणवत्ता प्राप्त उमेदवारांना रिक्त पदांची संख्या विचारात घेता पुरेशा प्रमाणात बोलावण्यात येईल व त्यांची योग्यता कागदपत्र पडताळणीअंती ठरविण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांकडून ऑनलाईन भरण्यात आलेली माहिती चुकीची, असंबंधीत अथवा दिशाभुल करणारी आढळून आल्यास असा उमेदवार गुणवत्ता यादीत अग्रस्थानी असला तरी त्यास त्याक्षणी अपात्र ठरविण्यात येईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**महत्वाची सुचना: परिक्षार्थी उमेदवारांनी, लेखी परिक्षेदरम्यान कोविड १९ प्रतिबंधक नियमांचे तंतोतंत पालन करावे तसेच मास्क, सॅनीटाईझर इत्यार्दीचा पुरेपुर वापर करावा.**

**स्वाक्षरीत/-**
कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला